| | |
|---|---|
| | संक्षिप्त फौजदारी केस नंबर : ३६८/२०२६<br>महाराष्ट्र शासन वि. किरण उर्फ अमीत मोहन धोत्रे |

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चा अधिनियम प्रकरण बावीस संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र. १ यांचे कार्यालय

१. अपराध घडल्याचा दिनांक – ०१.०६.२०२६

२. अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक – ०१.०६.२०२६

३. फिर्यादराचे संपूण नाव व पत्ता – म.सरकारतर्फे पोलीस ठाणे अधिकारी, वडूज पोलीस ठाणे.

४. आरोपींचे संपूर्ण नांव वय व पत्ता – किरण उर्फ अमीत मोहन धोत्रे, व.व. २७, राहणार – मु. पो. कुमठे, ता. खटाव, जि. सातारा.

५. ज्याबद्दल फिर्याद दिली व जो अपराध आरोपींना समजावून सांगणेत आला त्या अपराधाचा तपशिलः–

तुम्ही दि. ०१.०६.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास वडूज हद्दीत रिक्षा स्टॅण्ड वडूज परिसरात सार्वजनिक ठिकाणी मोठमोठयाने आरडाओरड करून धिंगाणा करून सार्वजनिक शांततेचा भंग केला, गैरशिस्त वर्तन करून शांतता भंग करताना मिळून आले म्हणून तुम्ही मुंबई पोलीस अधिनियम ११०/११७ अन्वये अपराध केला आहे.

६. <u>आरोपीचे प्रतिकथन –</u>

प्रश्न १ – तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर – होय.

प्रश्न २ – तुम्हाला आता तुमचेवरचा दोषारोप मराठीतून समजावून सांगितला तो समजला काय ?
उत्तर – होय.

प्रश्न ३ – तुला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – मला गुन्हा कबूल आहे.

---------

आरोपीची सही

समक्ष

MOHAMMED IMRAN DARYAWARDI

Digitally signed by MOHAMMED IMRAN DARYAWARDI
Date: 2026.06.01 15:28:53 +0530

वडूज.
(एम. आय. एस. दर्यावर्दी)

दिनांक ०१.०६.२०२६.
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडूज

## न्यायनिर्णय
## (घोषीत दिनांक ०१.०६.२०२६)

उपरोक्त आरोपीने स्वतःहून अर्ज देवून भारतीय दंड संहितेचे कलम १८८ प्रमाणे गुन्हा केल्याचे कबूल केले आहे.

आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीने त्याचे हातून नकळत गुन्हा घडला आहे व झाले गुन्ह्याबाबत त्यास पश्चाताप झाला असून त्याने कमीत कमी दंडाची शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. गुन्ह्याचे स्वरुप तसेच आरोपीचे कबूलीचे कथन यांचा विचार करता आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपी किरण उर्फ अमीत मोहन धोत्रे यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये मुंबई पोलीस अधिनियम ११०/११७ प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येत असून त्याला मुंबई पोलीस अधिनियम ११०/११७ या गुन्ह्याकरिता रक्कम रुपये ***२००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त***) दंड, दंड न भरलेस आरोपीला दोन (२) दिवसांची साधी कैद सुनावणेत येत आहे. अशी दंडाची शिक्षा सुनावणेत येत आहे.

MOHAMMED IMRAN DARYAWARDI

Digitally signed by MOHAMMED IMRAN DARYAWARDI
Date: 2026.06.01 15:29:00 +0530

वडूज.
दिनांक ०१.०६.२०२६.

(एम. आय. एस. दयावदा)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडूज